संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये विधानमंडळाला अनन्यसाधारण महत्व आहे. जनतेने मताधिकाराचा वापर करुन निवडलेले सदस्य हे विधिमंडळ सभागृहात प्रतिनिधित्व करीत असतात त्यामुळे संसदीय व्यवस्थेमध्ये जनतेच्या आशाआकाक्षांचे प्रतिबिंब उमटत असते. संविधानाच्या तरतुदीप्रमाणे संपूर्ण मंत्रिमंडळ व कार्यकारी प्रशासन हे विधिमंडळाला जबाबदार असते. किंबहुना विधिमंडळे ही प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याची भूमिका पार पाडीत असते. यासाठी अर्थसंकल्प, संसदीय आयुधे, समिती पध्दती इत्यादी माध्यमे सदस्यांना उपलब्ध आहेत. या सर्व बाबींचा सांगोपांग विचार केल्यास विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांच्या भूमिका व कार्य हे अत्यंत जबाबदारीचे असून लोकशाही प्रक्रियेमध्ये त्यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच लोकशाही पध्दतीत दोन्ही सभागृह म्हणजे विधानपरिषद व विधानसभा सदस्यांना विशेष महत्त्व व अधिकार आहेत. या सदस्यांनी आपले संसदीय कर्तव्य बजावताना जनतेच्या मागण्या, त्यांच्या भावना योग्य त्या संसदीय आयुधांचा वापर करुन शासनासमोर मांडल्या पाहिजेत, यासाठी संसदीय प्रणालीचा आत्मा असलेल्या संवाद प्रक्रियेस महत्त्व दिले गेले पाहिजे. एखाद्या विषयावर आपल्या भावना तीव्र जरी असल्या तरीही त्या वैधानिक मार्गाचा अवलंब करुन सभागृहासमोर येणे गरजेचे आहे. त्यासाठी सदस्यांना सतत सहकार्याची, प्रबोधनात्मक माहिती सजगतेने उपलब्ध करुन देण्याची व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सल्ल्याची गरज भासत असते. संसदीय प्रणालीत काम करणाऱ्या सदस्यांना वेळोवेळी नि:पक्षपातीपणे सल्ला व मार्गदर्शन देण्याचे काम एखाद्या संस्थेने करावे तसेच विविध समाजघटकांसाठी संसदीय लोकशाहीची माहिती देणारे प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात यावेत जेणेकरुन संसदीय लोकशाही दृढमूल व्हावी या हेतूने व संकल्पनेने राज्य विधिमंडळात वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राची स्थापना जानेवारी, २०११ मध्ये करण्यात आली.

विधिमंडळाबाहेर राजकीय पक्ष, काही निश्चित विचारसरणी असलेल्या संस्था व तत्सम व्यक्तीने, संस्थेने आपापल्या परीने अशा प्रकारचे कार्य अविरतपणे करणे आवश्यकच आहे. त्याचबरोबर, विद्यमान वैधानिक यंत्रणेत, दैनंदिन कामकाजाचा सतत अनुभव असणाऱ्या व अव्याहत नव्याने येणाऱ्या कायद्याच्या दुरुस्तीचा विचार करुन त्यात सुधारणा करणाऱ्या वैधानिक संस्थेने अशा प्रकारची एक यंत्रणा उभारली असून त्याचा फायदा राज्यातील सर्वच राजकीय पक्षांना भविष्यात होणार आहे. निर्वाचित सदस्यांना विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभण्यासाठी महाराष्ट्र विधिमंडळाने

याबाबत चिंतन केले, विचारविनिमय केला आणि महाराष्ट्र विधानपरिषदेचे दीर्घकाळ सभापतीपद भूषविलेले माजी सभापती, संसदपटू, व तत्वचिंतक कै. वि.स.पागे यांच्या नावाने एक केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतला. कै. पागे यांनी आपल्या सभापतीपदाच्या कारकिर्दीत संसदीय प्रणाली, सभागृहाचे कामकाज, कार्यपध्दती याबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले, नुसतेच निर्णय घेतले नाहीत तर दिशादिग्दर्शनही केले. त्यामुळे सभागृहातील सदस्यांची भूमिका, विचारधारा व शासनाची भूमिका या सगळयांची त्यांनी त्या त्या वेळी मांडणी केली, नियमात सुधारणा केली. या केंद्रानेही अशाच प्रकारचे चिंतन करावे आणि सदस्यांचे प्रबोधन करावे असे अपेक्षित आहे. या प्रबोधनाच्या कामासाठी  केवळ निर्वाचित सदस्य नव्हे तर प्रसिध्दी माध्यम, प्रशासनातील संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्ग, महाविद्यालयीन विद्यार्थी व ज्यांना संसदीय कामकाजाबाबत जागरुकपणे काम करण्याची इच्छा आहे अशा सर्व संबंधितांना हे केंद्र एक व्यासपीठ म्हणून उपलब्ध झाले आहे.

भारतीय संसदीय लोकशाहीच्या गौरवशाली आणि अभिमानास्पद परंपरेचे प्रतीक म्हणजे महाराष्ट्र विधानमंडळ होय, येथील वाद-प्रतिवाद-सुसंवाद ही परंपरा आणि त्यातून व्यक्त होणारे विचारवैभव महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेहमीच एक पाऊल पुढे ठेवत आले आहे. वैधानिक कामकाजाची सकारात्मक बाजू प्रसिध्दीमाध्यमांद्वारे जनसामान्यांपर्यंत पूर्णांशाने पोहोचतेच असे नाही. बऱ्याचदा अपवादात्मक घटना जणू नियम बनल्याप्रमाणे सादर होत असल्याने व्यवस्थेविषयीची नकारात्मकता वाढीस लागते. टीकात्मक परीक्षण आवश्यक असले तरी नकारात्मकतेचा सततचा मारा जनसामान्यांमध्ये नैराश्य व वैफल्यता निर्माण करु शकतो. ही बाब संसदीय लोकशाहीच्या सुदृढ आणि निकोप वाढीसाठी योग्य ठरणारी नाही. या पार्श्वभूमीवर वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रासारख्या उपक्रमांची अत्यंतिक आवश्यकता आहे.

विधिमंडळ सदस्यांना सभागृहाच्या कामकाजाची माहिती चांगल्याप्रकारे व्हावी व सभागृहाचे कामकाज अधिक लोकाभिमुख व्हावे यासाठी या प्रशिक्षण केंद्रातर्फे विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तसेच विधानपरिषदेच्या  नवनिर्वाचित सदस्यांसाठी प्रशिक्षण वर्गाचे नियमित आयोजन लोकसभेच्या प्राईड, केंद्र शासनाचे ग्रामविकास विभाग तसेच अशासकीय संस्था आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञांमार्फत करण्यात येते. राजकीय, आर्थिक, सामाजिक, भारताचे संविधान, कृषी, पर्यावरण, ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य, मराठी भाषा अशा विविध विषयांवर मंत्रालयीन

विभागांशी समन्वय साधून सन्माननीय विधिमंडळ सदस्यांसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते.

विधिमंडळातील कामकाजाची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी व त्यांचे योग्य त्या पध्दतीने प्रबोधन व्हावे तसेच जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका व अन्य निर्वाचित सदस्यांनाही स्थानिक प्राधिकरणाच्या कामकाजाबरोबरच विधिमंडळाच्या कामकाजाच्या प्रथा, परंपरांची तज्ज्ञांमार्फत माहिती करुन देणे, लोकप्रतिनिधींना मार्गदर्शन करणे त्याचबरोबर पदव्युत्तर शिक्षण घेणारे स्नातक व प्रसिध्दी/ प्रसारमाध्यमात काम करणारे मान्यवर पत्रकार, विधिमंडळ सदस्यांचे स्वीय सहायक, सरकारी अधिकारी, शासकीय सेवेसाठी निवड झालेले गट-अ व गट- ब संवर्गातील प्रशिक्षणार्थी यांना संसदीय कामकाजाची ओळख व्हावी यासाठी विविध उपक्रम / प्रशिक्षण वर्ग केंद्रामार्फत राबिवले जातात. विधिमंडळ सदस्यांसोबतच राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समितीतील निर्वाचित झालेल्या सदस्यांना देखील संसदीय कामकाजाचे प्रशिक्षण मिळावे हे या केंद्राचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या मुख्य उद्दिष्टांव्यतिरिक्त विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थी, पत्रकार, स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी आदिंच्या अभ्यासगटासाठी एक दिवसीय कार्यशाळांचे आयोजन सातत्याने केले जाते. यामध्ये दोन्ही सभागृह तसेच मध्यवर्ती सभागृह यांना भेटी आणि सभागृहासंदर्भातील माहिती दिली जाते. तसेच संचालक आणि विधानमंडळातील अधिकारी यांची व्याख्याने या अभ्यासभेटीदरम्यान आयोजित केली जातात. याशिवाय विविध महाविद्यालयांना, संस्थांना, शासकीय आस्थापनांना भेटी देऊन भारतीय राज्यघटना, विधिमंडळ कामकाज, लोकशाहीची गौरवशाली परंपरा, विविध संसदीय आयुधे, समिती पध्दती इ. बाबत संबंधितांना माहिती दिली जाते.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तसेच मा. पीठासीन अधिकारी अशा मान्यवरांच्या संसदीय कामकाज, विधिमंडळातील भाषणे तसेच त्यांच्या जीवनकार्यावर आधारित स्मृतिग्रंथाची निर्मिती व प्रकाशन मा. पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार या केंद्रामार्फत करण्यात येते.

विधिमंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कामकाजाच्या आवश्यकतेनुसार संबंधित विषयांची सखोल माहिती प्राप्त होण्याकरिता तसेच कामात गतीमानता व सुसूत्रता आणण्याकरिता प्रशिक्षणाचे (In House Training) आयोजन वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत करण्यात येते.

## वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा हेतू आणि उद्देश

१) विधिमंडळ सदस्यांना संसदीय कार्यप्रणाली, महाराष्ट्र विधानमंडळाची गौरवशाली परंपरा याची माहिती देणे तसेच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कृषी, पर्यावरण, ग्रामविकास, आरोग्य सार्वजनिक हिताच्या प्रश्नासंबंधी त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करणे तसेच या विषयांवर राष्ट्रीय स्तरावरील आयोजित अभ्यासवर्ग/ कार्यशाळांमध्ये महाराष्ट्र विधिमंडळाच्या सदस्यांनी सातत्याने सहभागी व्हावे यासाठी अशा स्वरुपांचे कार्यक्रम आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी समन्वय साधणे.

२) राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद, इ. स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्यांना संसदीय कामकाज, प्रथा ,परंपरा यांची ओळख व्हावी यासाठी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करणे.

३) राज्यातील विविध महाविद्यालयातील राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन, विधी आणि वृत्तपत्रविद्या या विभागातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना तसेच विविध समाज घटकांना संसदीय कार्यप्रणाली, भारतीय राज्यघटना, विधिमंडळ कामकाज, लोकशाहीची गौरवशाली परंपरा, विविध संसदीय आयुधे, समिती पध्दती इ. बाबत माहिती करुन देण्यासाठी विधान भवन, मुंबई/ नागपूर येथे अभ्यासवर्गांचे आयोजन करणे, अथवा संबंधित महाविद्यालयांना, संस्थांना भेटी देऊन तेथे अभ्यास वर्ग/ कार्यशाळेचे आयोजन करणे.

४) शासकीय सेवेसाठी निवड झालेले गट- अ व गट- ब संवर्गातील प्रशिक्षणार्थी अधिकारी, प्रसिध्दी/ प्रसारमाध्यमात कार्यरत असलेले पत्रकार, ग्रामीण भागातील पत्रकार, तसेच विधिमंडळ सदस्यांचे स्वीय सहायक यांच्यासाठी संसदीय कामकाजासंदर्भातील कार्यशाळांचे आयोजन करणे.

५) मा. पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार राज्याचे माजी मुख्यमंत्री तसेच मा. पीठासीन अधिकारी अशा मान्यवरांच्या संसदीय कामकाज, विधिमंडळातील भाषणे तसेच त्यांच्या जीवनकार्यावर आधारित स्मृतिग्रंथाची निर्मिती व प्रकाशन.

६) विधिमंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कामकाजाच्या आवश्यकतेनुसार संबंधित विषयांची सखोल माहिती प्राप्त होण्याकरिता तसेच कामात गतीमानता व सुसूत्रता आणण्याकरिता प्रशिक्षणाचे (In House Training) आयोजन.